

# म्युच्युअल फंड

## सेविंगची नवीन पद्धत

NJ MUTUAL FUND
BUILT ON RULES

AMFI

# कोणे




# एके काळी....

ही गोष्ट आहे सुरेश नावाच्या एका तरूणाची, जो मुंबईतील एका सॉफ्टवेअर फर्ममध्ये सुमारे 5 वर्षे नोकरीला होता. आयुष्यभर मुंबईतच राहिल्याने सुरेशला शहराबाहेरच्या जगण्याची काहीच माहिती नव्हती. तथापि, सुरेशला गेल्या काही महिन्यांपासून शेती करण्याची अनावर ओढ लागली होती. त्याचं झालं होतं असं, की तो एका सुट्टीमध्ये घरच्यांबरोबर नाशिकला फिरायला गेला होता आणि तिथे त्याला द्राक्षाची शेती करायची आणि ही द्राक्षं प्रोसेसिंग युनिट्सना विकून त्यातून पैसे कमावण्याची कल्पना सुचली. त्यानंतर सुरेशने त्याच्यापाशी जी थोडीफार माहिती आणि पैसे होते त्यानुसार काही द्राक्ष बियाणं आणलं व द्राक्ष शेतीला सुरुवात केली. तथापि, त्याच्याकडे पुरेसा अनुभव नसल्याने, त्याला प्रचंड तोटा सहन करावा लागला. अशाप्रकारे हात पोळल्याने, त्याने शेती करण्याची कल्पना त्याला वाईट वाटू लागली आणि शेतीतून पैसे मिळणे शक्य नाही असा धसका त्याने घेतला...

**सुरेशप्रमाणेच आपल्यातील बरेच जण तुटपुंज्या माहितीवर फायनान्शियल मार्केटमध्ये पैसे गुंतवतात. आणि अशा अपयशामुळे व अपुऱ्या माहितीमुळे मग खोट्यानाट्या कंड्या पिकवल्या जातात, ज्याची परिणती आपल्या प्रोफाइलला साजेशा नसलेल्या गुंतवणुकी करण्यामध्ये होते. परिणामी आपल्या मनात फायनान्शियल मार्केटविषयी चुकीच्या कल्पना रुजतात.**

म्युच्युअल फंडातील गुंतवणुकींना मार्केटच्या जोखमी संभवतात.
गुंतवणूक करण्यापूर्वी कृपया स्कीम इन्फर्मेशन डॉक्युमेंट आणि स्टेटमेंट ऑफ ॲडिशनल इन्फर्मेशन काळजीपूर्वक वाचा.



....तर आता पुन्हा सुरेशच्या गोष्टीकडे वळूया, त्याने जर का समान स्वारस्य असलेल्या आणखी काही लोकांना एकत्र आणलं असतं आणि ज्यांना शेतीची जाण आहे अशा व्यावसायिकांची सशुल्क सेवा मिळवली असती तर त्या व्यावसायिक नैपुण्याच्या आधारे त्यांचं स्वप्न एकत्रितपणे पूर्ण झालं असतं. सदस्यांचे पैसे 'सामूहिक' पणे गोळा करून त्यांचं दैनंदिन व्यवस्थापन जर व्यावसायिकांच्या हाती सोपवलं असतं, तर हे सहजपणे जमलं असतं. खरं तर, स्वप्नाचं मूल्य ठरवून त्यानुसार पैसे गोळा करता आले असते. त्याप्रमाणेच, काही लोकांना जर गुंतवणुकीवर दीर्घ मुदतीनंतर उत्पन्न हवे असेल, तर ते त्यांच्या उद्दिष्टांच्या आणि काल–कक्षेच्या अनुषंगाने पैसे आणू शकतात. म्युच्युअल फंड्स लोकांकडून पैसे गोळा करतात आणि त्यांच्या उद्दिष्टांच्या अनुसार गुंतवतात. लक्षात ठेवायची गोष्ट ही की, ही निवड त्यांची लक्ष्ये आणि काल–कक्षेवर अवलंबून राहील.

कृपया अन्य कोणत्याही तपशीलांसाठी तुमच्या नजीकचे म्युच्युअल फंड ऑफिस/फायनान्शियल डिस्ट्रिब्यूटर (बँका/वैयक्तिक फायनान्शियल ॲडवायजर, वगैरे) बरोबर संपर्क साधा.

# म्युच्युअल फंडाची संकल्पना

**01**

समान फायनान्शियल उद्दिष्टे असलेले गुंतवणूकदार त्यांचे पैसे एकत्र जमवतात

**02**

गुंतवणूकदारांना त्यांनी जमा केलेल्या रकमेच्या प्रमाणानुसार म्युच्युअल फंड युनिट्स मिळतात

**03**

गुंतवणूकदारांकडून जमा केलेली रक्कम फंड मॅनेजरांकडून शेअर्स, डिबेंचर्स आणि अन्य सिक्युरिटीज मध्ये गुंतवली जाते

**04**

फंड मॅनेजर नफा किंवा तोट्याची रक्कम ठरवतात आणि डिविडंड किंवा मिळालेले व्याज जमा करतात

**05**

अशा गुंतवणुकींमधून मिळणारा भांडवली नफा किंवा तोटा गुंतवणूकदारांना त्यांच्याकडे असणाऱ्या युनिटांच्या संख्येच्या प्रमाणात वाटला जातो



**ज्यांच्याकडे नैपुण्य किंवा स्वत:च्या गुंतवणुकींची काळजी घेण्यासाठी पुरेसा वेळ नसतो अशा लोकांसाठी म्युच्युअल फंड हे एक सर्वोत्तम वाहन ठरतात.**

म्युच्युअल फंडाची संकल्पना ही मनामध्ये एक सामाईक उद्दिष्ट ठेवून साधनस्रोतांचा संचय करण्यावर काम करते. दुसऱ्या शब्दात सांगायचं तर, म्युच्युअल फंड हा अनेक गुंतवणूकदारांनी एकत्र संचय केलेल्या पैशांतून साकारला जातो. हे पैसे काही स्टॉक्समध्ये आणि बाँड्स/कमोडिटीज सारख्या अन्य फायनान्शियल इन्स्ट्रूमेंट्समध्ये गुंतवण्यासाठी एका व्यावसायिकाकडे (ज्याला फंड मॅनेजर असं म्हटलं जातं) सुपूर्द केले जातात. प्रत्येक म्युच्युअल फंड स्कीमचे उद्दिष्ट हे काटेकोरपणे शब्दबद्ध केलेले असते आणि एक म्युच्युअल फंड कंपनी असा तिचा सुस्पष्ट उल्लेख असतो, जसं की ॲसेट मॅनेजमेंट कंपनी (AMC). सोप्या शब्दात सांगायचं तर, म्युच्युअल फंड ही अशी एक कंपनी असते, जी लोकांचा एक समूह तयार करते आणि त्यांचे पैसे, स्टॉक्स, बाँड्स व अन्य सिक्युरिटीजमध्ये गुंतवते. प्रत्येक गुंतवणूकदाराच्या मालकीची युनिट्स असतात, जी संबंधित गुंतवणूकदाराने गुंतवलेल्या रकमेवर आधारित फंडाच्या धारणेच्या एका हिश्शाची प्रतिनिधी असतात.

# म्युच्युअल फंड : नवीन अवतारामध्ये बचत

प्रत्येक म्युच्युअल फंडाचे व्यवस्थापन एका 'फंड मॅनेजर' द्वारा केले जाते, जो गुंतवणुकीच्या व्यवस्थापनाची कौशल्ये वापरून आवश्यक ते संशोधन कार्य करून, गुंतवणूकदाराने स्वत: व्यवस्थापन केले असता मिळवले असते त्यापेक्षा अधिक चांगले उत्पन्न मिळवून देण्यासाठी सक्षम असतो. मुद्दलाची मूल्य वृद्धी तसेच ह्या गुंतवणुकीतून मिळणारी अन्य उत्पन्ने ही गुंतवणूकदारांच्या (ज्यांना युनिटधारक देखील म्हटलं जातं) मालकीच्या युनिटांच्या संख्येच्या प्रमाणात गुंतवणूकदारांना दिली जातात. थोडक्यात, **म्युच्युअल फंड्स हे बचतीचे नवीन मार्ग आहेत.** तेव्हा आपण ही युनिट्सची संकल्पना अधिक नीटपणे समजून घेऊया.

**म्युच्युअल फंड्स हे फंडाच्या गुंतवणुकीच्या उद्दिष्टांच्या अनुरोधाने आणि गुंतवणूकदारांनी मान्य केल्याप्रमाणे वेगवेगळ्या मार्केट्स आणि सिक्युरिटीजमध्ये गुंतवण्यासाठी गुंतवणूकदारांकडून पैसे गोळा करणारे वाहन आहे.**

# युनिट्स. लहान पण शक्तीवान साधन

युनिट, हे व्यापक व्याख्येनुसार, सर्वसाधारणपणे एक्स्चेंजसाठी स्टँडर्ड म्हणून स्वीकारले जाते. एका उदाहरणातून हे समजून घेऊया. समजा, चॉकोलेटच्या एका बॉक्सची किंमत रू.40 आहे. ह्या बॉक्समध्ये एक डझन चॉकॉलेट्स आहेत. चार मित्रांनी ही चॉकोलेट्स घ्यायची ठरवली आहेत. पण त्या प्रत्येकाकडे 10 रूपयेच आहेत आणि दुकानदार फक्त अख्खा बॉक्सच विकतो. म्हणजे दुसऱ्या शब्दात सांगायचं तर ते 4 मित्र एक डझन चॉकोलेट्स मिळविण्यासाठी प्रत्येकी रू. 10 एकत्र काढू शकतात. त्यांच्या योगदानाच्या अनुसार त्यांना प्रत्येकी 3 चॉकोलेट्स मिळतील. आपण एका चॉकोलेटला एक युनिट समजूया, म्हणजेच 12 चॉकोलेट्सची रू. 40 ही किंमत लक्षात घेता, एका युनिटची किंमत चॉकोलेट रू.3.33 आहे.

प्रत्येक मित्राने रू.10 दिले, आणि अशा प्रकारे त्याला 3 चॉकोलेट्स म्हणजे 3 युनिट्स मिळतील. त्याप्रमाणेच, म्युच्युअल फंडांमध्ये प्रत्येक गुंतवणूकदाराला त्याने/तिने गुंतवलेल्या रकमेचा प्रमाणात युनिट्स वाटली जातील. दुसऱ्या शब्दात सांगायच तर म्युच्युअल फंडातील प्रत्येक गुंतवणूकदार हा एका मोठ्या संचयाचा एक हिस्सा असेल, जो युनिटधारकांच्या सामूहिक मालकीचा असेल.

**म्युच्युअल फंड हा शेअर किंवा बाँड्ससाठी वैकल्पिक गुंतवणूक पर्याय होऊ शकत नाही. उलट तो अनेक गुंतवणूकदारांची बचत एकत्रित करतो आणि शेअर, बाँड्स, मनी मार्केट इन्स्ट्रूमेंट्स व अन्य प्रकारच्या सिक्युरीटीजमध्ये हे पैसे गुंतवतो.**



गुंतवणूकदार म्हणून प्रत्येकाची अपेक्षा अशी असते की :
मोठी मार्केट्स, व्यावसायिक मार्गदर्शन, सोयी, पारदर्शकता ह्यांचा लाभ मिळावा आणि गरज पडेल तेव्हा बचतही हाताशी असावी. त्यादृष्टीने आपण म्युच्युअल फंडांचे विविध लाभ पाहूया आणि एक आदर्श गुंतवणूक ठरण्यासाठी म्युच्युअल फंडांची क्षमता काय असते ते जाणून घेऊया.

# चला करूया लाभांची गणती

## 1 पोर्टफोलिओ (म्हणजेच ''इन्वेस्टमेंट बास्केट'') वैविध्यसमृद्धता

वडीलधारी मंडळी आपल्याला नेहमीच सांगतात की 'सगळीच अंडी एकाच टोपलीमध्ये ठेवू नका!' दुसऱ्या शब्दात सांगायचं तर, तुमच्या गुंतवणुकी वेगवेगळ्या गुंतवणूक परड्यांमध्ये ठेवा, म्हणजेच गुंतवणुकींमध्ये वैविध्य असावे. वैविध्यसमृद्धता आणण्यासाठी पैसे वेगवेगळ्या प्रकारच्या गुंतवणुकीमध्ये विखरून ठेवायला हवेत. म्हणजे एखाद्या गुंतवणुकीचे मूल्य कमी झाल्यास, आणखी कुणाचे तरी वाढण्याची शक्यता रहाते. गुंतवणुकींच्या धारणांमध्ये वैविध आणल्याने जोखीम खूपच कमी होते. म्युच्युअल फंड्स नेमकं हेच करतात. म्युच्युअल फंड्स विविध सिक्युरीटीजमध्ये गुंतवणूक करतात आणि त्यामुळे एक गुंतवणूकदार ह्या नात्याने तुम्हाला गुंतवणुकीची वैविध्यसमृद्ध परडी लाभते. परिणामी तुमची सुरक्षितता वाढते व जोखीम कमी होते.

## 2 रोखीकरण सुलभता




असा विचार करून बघा की तुमच्या मुलीचं लग्न आहे, ज्यासाठी तुम्ही दीर्घकाळ गुंतवणूक केली आहे आणि ही गुंतवणूक तुम्हाला चांगलं उत्पन्न देखील देत आहे. मात्र, तुम्हाला ज्या दिवशी ही रक्कम हवी आहे त्या दिवशी तुम्हाला ती परत मिळू शकत नाही. तुम्हाला जर तुमची रक्कम पाहिजे तेव्हा वापरता येत नसेल तर ते भरघोस उत्पन्न काय कामाचं! खरं तर, आपणा सर्वांनाच गरजेच्या वेळी पैसे हवे असतात. ह्यालाच 'रोखीकरण सुलभता' असं म्हणतात, म्हणजेच आपल्याला पाहिजे तेव्हा आपली बचत काढून घ्यायची उपलब्धता हवी. म्युच्युअल फंड तुम्हाला नेमकी हीच सुविधा पुरवतो – रोखीकरण सुलभता.

## 3 कमी जोखीम

पूर्वी चर्चा केल्याप्रमाणे, वैविध्यसमृद्धता ही जोखीम मोठ्या प्रमाणात कमी करते. तथापि, कोणतीही गुंतवणूक खरेदी करण्याचा वा विकण्याचा निर्णय घेण्यापूर्वी फंड मॅनेजर सर्वप्रथम जोखीम आणि नंतर उत्पन्न विचारात घेतात. गुंतवणुकीच्या अन्य कोणत्याही स्वरूपाच्या तुलनेमध्ये अनेकांचे पैसे एकत्र केले जात असल्याने जोखीम विखुरली जाते आणि ती मोठ्या प्रमाणात कमी होते.

## 4 ट्रँजॅक्शनचा खर्च कमी

घाऊक प्रमाणात केलेली खरेदी ही किरकोळीपेक्षा स्वस्त पडते हे आपणा सर्वांनाच ठाऊक असतं. अशाप्रकारे, अनेकांच्या बचती एकत्र आणल्यामुळे आणि त्यांच्या वतीने म्युच्युअल फंडाला व्यवहार करू दिल्यामुळे, म्युच्युअल फंडांना घासाघीस करण्याचे मोठेच बळ प्राप्त होते आणि अशा रितीने ट्रँजॅक्शनच्या खर्चामध्ये एकंदरीतच खूप घट होते, जो आपण एकेकट्याने केला असता स्वत:ला सोसावा लागला असता.

## 5 व्यावसायिक व्यवस्थापन

आपण आपले केस घरी कापतो का! ह्याचं उत्तर अर्थातच 'नाही' असं आहे. तर त्यासाठी आपण त्या कामात वाकबगार असलेल्या न्हाव्यांकडे जातो, तसेच हे काम एखादा 'हेअर ड्रेसर' अधिक सफाईदारपणे करेल हे देखील आपल्याला ठाऊक असतं. त्याप्रमाणेच म्युच्युअल फंडांमध्ये तुमच्या पैशांचे व्यवस्थापन हे व्यावसायिक फंड मॅनेजर द्वारा केले जाते, ज्यांनी फंडांच्या व्यवस्थापनमध्ये नैपुण्य मिळवलेलं असतं आणि त्यांना अत्युत्तम संशोधन व नवीन प्रवाहाची जाण ह्यांचे पाठबळ लाभलेलं असतं.

## 6 योजनांमधून निवडीसाठी वाव




आपण अनके कारणांमुळे बचत/गुंतवणूक करत असतो; कुणाला काही वर्षांनंतर घर घ्यायचं असतं तर कुणाला 10 वर्षांनी होणाऱ्या मुलीच्या लग्नासाठी तजवीज करायची असते तर कुणाला 20 वर्षांनी येणाऱ्या स्वत:च्या सेवानिवृत्तीसाठी तरतूद करायची असते. तर गुंतवणुकीची उद्दिष्टे वेगवेगळी असल्यामुळे 'सबगोलंकार' तत्वज्ञान कामाचं ठरत नाही. अशाप्रकारे, गुंतवणुकीचे उद्दिष्ट आणि काल-कक्षा ह्यानुसार म्युच्युअल फंडांच्या योजनांच्या गुच्छातून निवड करणे शक्य होते.

## 7 पारदर्शकता आणि सुरक्षितता


तुम्ही जेव्हा तुमची बचत कुणाच्या हाती सुपूर्द करता, तेव्हा तुमच्या पैशांचं काय कलं जातंय हे तुम्हाला जाणून घ्यायचं असतं ना? अलबत, हे कळणं गरजेचंच असतं! पैसे तुमचे असल्याने त्याविषयी जाणून घ्यायचा तुमचा अधिकारच आहे. म्युच्युअल फंडांची हाताळणी व्यावसायिक फंड मॅनेजर्स द्वारा होत असल्यामुळे, ही सिस्टिम पूर्णपणे पारदर्शक असते. दुसऱ्या शब्दात सांगायचं तर, तुमचे पैसे कुठे चालले आहेत ह्याची तुम्हाला नेमकी कल्पना असते. अशाप्रकारे, पारदर्शकता तुम्हाला आपोआपच सुरक्षिततेची भावना बहाल करते. पारदर्शक सिस्टिममुळे तुम्हाला सर्व गोष्टी ताबडतोब कळतात (जसं की, तुमची बचत कुठे गुंतवली जात आहे, गुंतवणूक किती प्रमाणात होत आहे, वगैरे) आणि तुम्हाला जर ते समाधानकारक वाटलं नाही तर तुम्ही तुमची बचत काढून घेऊ शकता तसेच सुरक्षित राखू शकता.

## 8 लवचिकता

पैसे कमावण्याच्या आणि खर्च करण्याच्या पद्धती ह्या प्रत्येकाच्या वेगळ्या असू शकतात. बिझनेस आणि वेतनदार व्यक्तींचे उत्पन्नाचे ओघ वेगळे असतात. अशाप्रकारे, गुंतवणुकीचं वाहन/परडी लवचिक असायला हवी आणि गुंतवणूकदाराला त्याच्या मिळकतीच्या ओघाप्रमाणे गुंतण्याची अनुमती असायला हवी. हीच गोष्ट पैश्यांच्या गरजेच्या बाबतीतही खरी आहे. पूर्वी म्हटल्याप्रमाणे गुंतवणुकीची वेगवेगळी उद्दिष्टे असलेल्या लोकांना त्यानुसार पैसे काढायचे असतात. उदाहरणार्थ, एखादी व्यक्ती भले सेवानिवृत्तीसाठी गुंतवणूक करीत असली तरी घरातील कुणी आजारी पडलं असता त्याला/तिला आकस्मिक पैसे काढायची निकड भासू शकते.
अशा प्रसंगी गुंतवणुकी लवचिकच असायला हव्यात, ज्यामुळे त्या गरजेच्या वेळी कामाला येऊ शकतात. म्युच्युअल फंड्स हे गुंतवणूक करताना तसेच पैसे काढताना लवचिकतेची तरतूद करतात; साहजिकच ते तुमच्यासाठी योग्य आणि सर्वोत्तम निवड ठरतात.



वर उल्लेखलेल्या सर्व मुद्यांमधून उदयाला येणारी सर्वात महत्वाची जमेची बाजू आहे ती म्हणजे प्रत्येक टप्प्यावरील सोयीसुविधा. दुसऱ्या शब्दात सांगायचं तर तुम्ही तुमचं लक्ष्य निश्चित केल्यापासून प्रत्यक्ष गुंतवणूक करेपर्यंत, म्हणजेच तुम्ही गुंतवणुकीच्या कालावधीत असल्यापासून रकमेची गरज भासेपर्यंत, प्रत्येक टप्प्यावर तुमची यथास्थित काळजी घेतली जाते. आपण ह्या मुद्याचा सखोल अभ्यास करूया. तुम्ही एकदा का तुमचं लक्ष्य निश्चित केलंत तुम्ही ऑनलाइन किंवा ऑफलाइन गुंतवलेले रहायचा पर्याय निवडू शकता. हीच गोष्ट पैसे काढण्याला देखील लागू होते. ह्या पुस्तिकेच्या पुढच्या भागात ह्यावर तपशीलवार चर्चा करू.



# समज

म्युच्युअल फंड तज्ज्ञांसाठी असतात.


# सत्यस्थिति

प्रत्यक्षात हे अगदी उलटं आहे. इक्विटी मार्केटमध्ये जसं शेअर्स कधी खरेदी करायचे वा विकायचे हे तुम्हाला ठरवावं लागतं, तसे म्युच्युअल फंडामध्ये करावं लागत नाही. तर हे सारं फंड मॅनेजर तुमच्यासाठी करतात. वेगवेगळी क्षेत्रं आणि कंपन्यांवर लक्ष ठेवणं हे त्यांचं काम असतं आणि तुम्ही व अन्य गुंतवणूकदारांनी दिलेले पैसे कुठे घालायचे हे ते ठरवतात.

# लक्षात ठेवा : संख्यापेक्षा लक्ष्ये महत्वाची

तुम्ही आतापर्यंत पाहिलं असेलच की आपण लक्ष्यांविषयी खूप बोलतो आणि गुंतवणुकींबरोबर त्यांची सांगड घालतो. आपण असं म्हणूया की तुम्ही खूप पैसे दिले आहेत, तथापि तुम्हाला कशावरही किंवा तुमच्या कोणत्याही लक्ष्यावर खर्च करायची अनुमती नाही. किंवा तुम्ही ना कुठे गुंतवणूक करू शकता किंवा ना कुणाला पैसे धर्मादाय देऊ शकता. तर मग तुम्हाला त्या पैशांचा उपयोग काय आहे? त्या पैशांचा तुम्ही बेड बनवण्याखेरीज आणि त्यावर झोपण्याखेरीज किंवा पैशांच्या बंडलांच्या भिंती करण्याखेरीज आणखी कोणताही उपयोग करू शकत नाही. तर एकूणात काय की एक माणूस ह्या नात्याने आपण भावनांना किंमत देतो आणि आकड्यांना नाही. उदाहरणार्थ, तुम्ही जेव्हा तुमच्या घरच्यांबरोबर एखाद्या रेस्टॉरंटमध्ये जाता, तेव्हा तेथील अन्नाचा आस्वाद घेताना खुललेले तुमच्या घरच्यांचे चेहेरे हे तुम्हाला आनंद देतात, ज्यापुढे फूड/माहोल वगैरेवर तुम्ही जो खर्च केलेला असतो ती रक्कम तुमच्या खिजगणतीत नसते.

**आपण अत्यंत स्पष्टपणे समजावून घेऊया की एक मानव ह्या नात्याने आपल्याला उत्पन्न कळू शकणार नाही आणि आपल्याला आकडे कळू शकणार नाहीत. मात्र, त्यांच्याशी निगडित लक्ष्ये आपल्याला नक्कीच कळू शकतील. जसं की, तुम्ही जर तुमच्या मुलाच्या शिक्षणासाठी बचत/गुंतवणूक करत असाल, तर तुमच्यासाठी महत्वाची गोष्ट असते ती म्हणजे आवश्यक ते पैसे वेळेवर मिळणं आणि ते पुरेसे असणं. अशाप्रकारे, तुमची लक्ष्ये प्रथम डोळ्यासमोर साकारून आणि नंतर गुंतवणुकीचे निर्णय घेऊन तुमची लक्ष्ये प्राप्त करण्यासाठी तुम्हाला हातभार लागतो.**



सर्वसामान्य भारतीय माणसे कुठे आणि कशासाठी बचत/गुंतवणूक करतात ते आपण समजून घेऊया. लोक एक तर अल्प मुदतीच्या गरजांसाठी त्यांचे पैसे बँकेच्या बचत खात्यामध्ये ठेवतात, कारण त्यांचं मुख्य उद्दिष्ट मुद्दल नीट संभाळणे हे असतं. त्यानंतर उत्पन्नाच्या दृष्टीने लोक त्यांचे पैसे फिक्स्ड डिपॉजिट्स (मुदती ठेवी) किंवा पोस्ट ऑफिसच्या योजनांमध्ये ठेवतात. आणि गुंतवणुकीचं तिसरं क्षेत्र आहे ते म्हणजे रीअल इस्टेट (स्थावर मालमत्ता) आणि सोनं, जिथे गुंतवणुकीचं मुख्य उद्दिष्ट मुद्दलामध्ये वाढ घडवणे हे असतं. एकूणात, तुम्ही खालील कारणांसाठी बचत/गुंतवणूक करता :


1) मुद्दलाचं संवर्धन करणे
2) उत्पन्न निर्माण करणे
3) मुद्दलामध्ये वाढ घडवणे

सर्वोत्तम भाग असा की वरील तीनही प्रयोजनांसाठी, म्युच्युअल फंड अचूक ठरतात. हे आपण तपशीलवार आणि अधिक सोप्या पद्धतीने समजा घेऊ. रचना, घटक, गुंतवणुकीची उद्दिष्टे वगैरे गोष्टी लक्षात घेता म्युच्युअल फंड वेगवेगळ्या प्रकारचे असतात. ह्या वेगळेपणापासून गुंतवणुकींच्या वेगवेगळ्या गरजांची पूर्तता होते.

# गुंतवणुकीची उद्दिष्टे

| | | | |
|---|---|---|---|
| मुद्दलाचं संवर्धन करणे | बचत बँक खातं | पीपीएफ | म्युच्युअल फंड |
| उत्पन्न निर्माण करणे | फिक्स्ड डिपॉजिट्स | पीओ-एमआयएम | म्युच्युअल फंड |
| मुद्दलामध्ये वाढ घडवणे | रीअल इस्टेट | सोनं | म्युच्युअल फंड |

# तुमची गणना कोणत्या प्रकारात करावी?



सुरेशला समजा दर महिन्याच्या 30 तारखेला पगार मिळतो आणि तो त्याच्या पगारातील 40% भाग हाउसिंग लोनचा ईएमआय स्वरूपात देतो आणि दर महिन्याची 10 ही त्याच्या ईएमआयची तारीख आहे. अन्यथा सुरेश त्याच्या बचत बँक खात्यामध्ये नेहमीच काही आकस्मिक निधी जमा ठेवत असतो हे पैसे बँकेकडे रहातात, ज्यावर द.सा. 4% एवढे किरकोळ व्याज मिळते. तथापि सुरेशला जर त्याच्या पैशांवर रोखीकरणसुलभता आणि सुरक्षेसह अधिक चांगलं उत्पन्न मिळण्याचा पर्याय दिला तर, सुरेशला ते अत्यंत महत्वाचे वाटून तो नक्कीच त्याचा विचार करील. अशाप्रकारे, तुम्हाला जर अल्प-मुदतीसीठी गुंतवणूक करायची असेल, तर तुम्ही जे पैसे सर्वसाधारणपणे बचत बँक खात्यामध्ये ठेवता, ते तुम्ही 'लिक्विड म्युच्युअल फंड' नावाने ओळखल्या जाणाऱ्या म्युच्युअल फंडांमध्ये गुंतवू शकाल.

## लिक्विड म्युच्युअल फंड्स :

वित्तीय संज्ञा म्हणून जेव्हा तुम्ही 'लिक्विड' हा शब्द वापरून आणि समजून घेता, ह्याचा अर्थ असा की संबंधित मालमत्तेवर रोख रक्कम सहजपणे मिळू शकते. 'लिक्विड म्युच्युअल फंड्स' मध्ये जोखीम कमी असते आणि त्यामध्ये बचत खात्यापेक्षा थोडेफार अधिक उत्पन्न मिळते. हे फंड कमी जोखमीच्या गुंतवणूक प्रकारांमध्ये पैसे गुंतवतात. आता, आपण 'उत्पन्नाची निर्मिती' हे गुंतवणुकीचे अन्य उद्दिष्ट विचारात घेऊया. पूर्वी चर्चा केल्याप्रमाणे, आपल्यातील बहुतेक जण हे फिक्स्ड डिपॉजिस्ट्स किंवा पोस्ट ऑफिसच्या सेविंग्ज स्कीम्समध्ये पैसे गुंतवतात. 'लोक इथे पैसे का गुंतवतात?' असं विचारलं असता, मिळू शकणार सर्वात सोपं उत्तर म्हणजे भले अडीनडीला तातडीने पैसे मिळत नसले तरी ही गुंतवणूक सुरक्षित असते आणि भरघोस उत्पन्न देते; आधी उल्लेख केल्याप्रमाणे, इथे गरज असते ती अशा गुंतवणूक वाहनाची जे अधिक सुरक्षित असेल आणि भरघोस उत्पन्नही देईल. ह्या वर्गवारीमध्ये 'डेब्ट म्युच्युअल फंड' अत्यंत चपखळपणे बसू शकतो.


# गुंतवणुकीची उद्दिष्टे

| | | | |
|---|---|---|---|
| मुद्दलाचं संवर्धन करणे | बचत बँक खातं | पीपीएफ | लिक्विड फंड |
| उत्पन्न निर्माण करणे | फिक्स्ड डिपॉजिट्स | पीओ-एमआयएम | डेब्ट फंड |
| मुद्दलामध्ये वाढ घडवणे | रीअल इस्टेट | सोनं | इक्विटी फंड |

## डेब्ट म्युच्युअल फंड्स :

डेब्ट फंड्स हे कमी जोखमीचे फंड्स असतात. त्यांचं उद्दिष्ट तुमच्या मुद्दलाचं संवर्धन करत असतानाच ठराविक उत्पन्न सातत्याने मिळवत रहाणे हे असतं, ज्या वैशिष्ट्यामुळे गुंतवणुकीच्या तुमच्या पोर्टफोलिओला स्थैर्य लाभण्यासाठी मदत होते. तशी सर्वच म्युच्युअल फंडांमध्ये काहीशी जोखीम असलीच तरी हे फंड लिक्विड फंडांपेक्षा अधिक जोखमीचे तथापि इक्विटी फंडांपेक्षा कमी जोखमीचे असतात. हे फंड्स बहुदा गव्हर्मेंट बाँड्समध्ये पैसे गुंतवतात आणि सुनिश्चित व्याज दराने उत्पन्न मिळण्यासाठी कॉर्पोरेट्सना (मोठ्या ऑर्गनायझेशन्स) रक्कम उधार देतात. अशाप्रकारे, तुम्हाला जर मध्यम-मुदतीच्या कालखंडासाठी लिक्विड फंड्सपेक्षा अधिक रक्कम मिळवायची असेल तर 'डेब्ट म्युच्युअल फंड्स'मध्ये पैसे गुंतवणे हे आदर्श ठरतं. अर्थात हे सारं असलं तरी, डेब्ट म्युच्युअल फंड्सना माफक जोखीम संभवतेच.

**डेब्ट : ह्याचा अर्थ उत्पन्नाच्या सुनिश्चित दराने (व्याजाचा दर) पैसे उसने/उधारीने देणे. अशाप्रकारे 'डेब्ट' मध्ये पैसे गुंतवणे म्हणजे सुनिश्चित व्याज दराने कंपन्यांना किंवा सरकारले पैसे देणं होय.**





## इक्विटी म्युच्युअल फंड्स :


इक्विटी फंड्स हे अन्य प्रकारच्या फंड्सपेक्षा अधिक जोखमीचे वाटतात, परंतु ते अन्य फंड्सपेक्षा अधिक उत्पन्न देखील मिळवून देतात. हे फंड्स कंपन्यांच्या इक्विटीमध्ये गुंतवणूक करतात. म्हणजेच शेअर्स खरेदी करतात (अंशत: मालकी). अशा प्रकारे, कंपनीच्या मालकांपैकी एक झाल्यामुळे कंपनीच्या कामगिरीच्या सोबत नफ्याची सांगड घातली जाते. दुसऱ्या शब्दात सांगायचं, तर जोखीम वाढू शकते. तथापि, वैविध्यीकरणामुळे, म्हणजेच अनके कंपन्यांमध्ये गुंतवणूक केल्यामुळे जोखीम खाली आणली जाते. तसेच प्रदीर्घ कालावधीमुळे जोखीम विखुरली जाते आणि उत्पन्नातील चढउतार समपातळी गाठतात. एखाद्या गुंतवणूकदाराला जर मुद्दली वाढीतून संपत्ती निर्मितीची आस असेल तर त्याने दीर्घ–मुदतीच्या इक्विटी फंडामध्ये गुंतवणूक करणे श्रेयस्कर ठरते आणि इतिहास असे दाखवून देतो की इक्विटीने आजवर गुंतवणुकींच्या अन्य वर्गवारीना कामगिरीमध्ये मागे टाकलं आहे.

तथापि, पूर्वी चर्चा केल्याप्रमाणे, म्युच्युअल फंड्स सर्व प्रकारच्या गुंतवणूकदारांसाठी उपलब्ध आहेत. अशाप्रकारे एखाद्या गुंतवणूकदाराला जर इक्विटी आणि डेब्ट म्युच्युअल फंड्स अशा दोघांमध्ये गुंतवणूक करायची असेल तर त्यासाठी ‘हायब्रीड म्युच्युअल फंड्स’ नावाची एक वर्गवारी आहे.

**इक्विटी : इक्विटीचे मालक होणे म्हणजे कंपनीमध्ये भागीदार होणे आणि भागीदाराचा नफा हा अमर्याद असू शकतो, तथापि, तोटा देखील अमर्याद होऊ शकतो. अशाप्रकारे इक्विटीतील गुंतवणुकी ह्या ‘जोखीम अधिक, उत्पन्न ही अधिक’ वर्गवारीमध्ये गणल्या जाऊ शकतात.**

## हायब्रीड म्युच्युअल फंड्स :

नावातून सुचित होत असल्याप्रमाणे ह्यामध्ये डेब्ट आणि इक्विटी फंड्सचं मिश्रण आहे, दुसऱ्या शब्दात सांगायचं तर : हायब्रीड फंड्स हे असे फंड्स आहेत ज्यांच्या पोर्टफोलिओमध्ये इक्विटीज, डेब्ट्स आणि मनी मार्केट सिक्युरीटीजचं मिश्रण असतं. इक्विटी आणि डेब्टच्या मिश्रणाच्या अनुसार हायब्रीड फंड्सचे देखील विविध प्रकार असतात. तुमच्या जोखीम पेलण्याच्या क्षमतेच्या अनुसार तुम्ही तुमच्या पोर्टफोलिओमध्ये हायब्रीड म्युच्युअल फंड्सचा अंतर्भाव करण्याचा विचार करू शकता. अशा प्रकारच्या फंडांमध्ये एक भाग असलेल्या 'डेब्ट घटकाद्वारे' पुरवल्या गेलेल्या 'सेफ्टी नेट'मुळे असे फंड हे 100% इक्विटी फंडापेक्षा कमी जोखमीचे ठरतात. म्युच्युअल फंड्स संकल्पना आणि म्युच्युअल फंड्सचे प्रकार समजून घेतल्यानंतर, ते कुठे आणि कसे खरेदी करायचे ह्यावर चर्चा करण्यापूर्वी 'एनएव्ही' ही आणखी एक महत्वाची संकल्पना समजून घेऊ.



# समज

म्युच्युअल फंड हे एक इक्विटी प्रॉडक्ट आहे.

# सत्यस्थिति


लोक जेव्हा फंडाचा विचार करतात, तेव्हा ते फक्त इक्विटी फंड्सचाच विचार करतात, परंतु सत्यस्थिती अशी आहे की म्युच्युअल फंड हे एक वाहन आहे, जे कोणत्याही प्रवाशाला सोबत नेऊ शकतं. इक्विटी म्युच्युअल फंड्स हे स्टॉक मार्केट्सचे शेअर्स खरेदी करतात आणि डेब्ट म्युच्युअल फंड्स हे गव्हर्मेंट बाँड्स, कॉर्पोरेट डिबेंचर्स आणि ट्रेझरी बिल्स सारखी डेब्ट प्रॉडक्ट्स खरेदी करतात. प्रत्येक प्रकारच्या फंडाची जोखीम ही बसमधील प्रवाशांवर अवलंबून असते.

# नेट ॲसेट व्हॅल्यू



'नेट ॲसेट व्हॅल्यू'चं संक्षिप्त रूप 'एनएव्ही' असं आहे. प्रत्येक शेअरला जशी किंमत असते, तशीच प्रत्येक म्युच्युअल फंडाला 'एनएव्ही' असते. दुसऱ्या शब्दात सांगायचं तर, एनएव्ही म्हणजे फंडाची प्रति युनिट मार्केट व्हॅल्यू होय. गुंतवणूकदार ह्या किंमतीच्या युनिटांची खरेदी/विक्री करू शकतात. म्युच्युअल फंडांच्या संदर्भात, मालमत्तेचं मूल्य म्हणजे फंडाच्या पोर्टफोलिओचे एकूण मूल्य वजा दायित्वं होय. मालमत्तेच्या ह्या मूल्याला शिल्लक असणाऱ्या युनिटांच्या संख्येने भागले असता येणारी रक्कम ही त्या विशिष्ट फंडाची 'एनएव्ही' होय. ही एनएव्ही सर्वसाधारणपणे दैनंदिन धर्तीवर गणण्यात येते.

'एनएव्ही' ही फंडाद्वारे धारण करण्यात आलेले शेअर्स/बॉंड्स/सिक्युरीटीज ह्यांची कोणत्याही दिवशी असलेली मार्केट व्हॅल्यू दर्शवते. कारण फंडाच्या पोर्टफोलिओमध्ये अनेक शेअर्स असल्याने, एनएव्ही ही पोर्टफोलिओवरील संयुक्त उत्पन्न दर्शवते. त्यामुळे तुम्ही गुंतवणूक करू इच्छित असलेल्या स्कीमचे एनएव्ही रू.15 किंवा रू.150 असल्याने कोणताही फरक पडत नाही. धारण केलेल्या एकूण गुंतवणुकीमध्ये समजा 10% वाढ झाली तर रू.15 ची एनएव्ही रू.16.5 होईल आणि रू.150 ची एनएव्ही रू.165 होईल. त्यामुळे तुम्ही जी एनएव्ही गुंतवाल, ती तुम्हाला 10% उत्पन्न मिळवून देईल. तेव्हा, 'कमी' एनएव्हीवर आणि युनिटांच्या जास्त संख्येवर लक्ष केंद्रित करण्याऐवजी पोर्टफोलिओचे उत्पन्न ठरवणारे जे अन्य घटक आहेत (परफॉर्मन्स ट्रॅक रेकॉर्ड, फंड मॅनेजमेंट, व्होलॅटिलिटी) ते विचारात घेणे अधिक श्रेयस्कर ठरतं. अधिक एनएव्ही असलेला फंड हा त्यामध्ये असलेल्या धारणांनी (शेअर्स/बॉंड्स/सिक्युरीटीज) अधिक चांगली कामगिरी बजावल्यास कमी एनएव्ही असलेल्या फंडांपेक्षा अधिक उत्पन्न मिळवून देऊ शकतो.



# समज

रू.10 एनएव्ही असलेला म्युच्युअल फंड हा रू.25 एनएव्ही असलेल्या म्युच्युअल फंडापेक्षा अधिक चांगला असतो.


# सत्यस्थिति


ही गुंतवणूकदारांच्या मनात अद्यापही रूजलेली एक मिथ्यकथा आहे. परंतु सत्यस्थिती अशी आहे की गुंतवणूक केलेल्या निधीवरील उत्पन्नाची टक्केवारी ही दुर्लक्षित रहाते किंवा नजरेतून सटकते. जसं की, 10%च्या समान पातळीची कामगिरी बजावणारी रू.10ची एनएव्ही रू.11 एवढी होईल तर रू.200 ची एनएव्ही रू.220 एवढी वाढेल. हे अगदी सोपं सत्य आहे जे ना सांगितलं जातं ना ऐकिंवात येतं.
खरं तर अगोदरच दाखवलेल्या कामगिरीमुळे रू.200 च्या स्कीमचे 10% वाढण्याची शक्यता ही नुकत्याच अवतरलेल्या स्कीमपेक्षा खूपच जास्त आहे.

कृपया अन्य कोणत्याही तपशीलांसाठी तुमच्या नजीकचे म्युच्युअल फंड ऑफिस/फायनान्शियल डिस्ट्रिब्यूटर (बँका/वैयक्तिक फायनान्शियल ॲडवायजर, वगैरे) बरोबर संपर्क साधा.

# दीर्घ-मुदतीच्या दूरदृष्टीची शक्ती

मध्यम–मुदतीच्या गुंतवणुकींच्या संकल्पनेची तुलना ही स्नोबॉलशी केली जाते – घरंगळताना त्या वाढत जातात. त्याप्रमाणेच, गुंतवणूक कितीही छोटी असो, तुमचे पैसे काळाच्या ओघात अधिक पैसे ओढतात आणि वाढतच जातात. ह्या प्रकारच्या फलश्रुतीसाठी ‘चक्रवाढ’ असा शब्द आहे. उजव्या बाजूला दाखवल्याप्रमाणे, दर महिन्याला 8% दराने गुंतवलेली रू.1000 एवढी छोटीशी रक्कम भरपूर उत्पन्न मिळवून देऊ शकते. खरं तर, दीर्घ काळपर्यंत गुंतवलेले छोटंसं योगदान हे तुमच्या भावी गरजांची काळजी घेण्यासाठी सक्षम असतं ह्यासाठी छोट्या योगदानांच्या पेक्षा तुमची लक्ष्ये वास्तवानुरूप असणं आणि तुमची गुंतवणूक सत्कारणी लागण्यासाठी पुरेसा धीर धरणं महत्वाचं असतं.






**चक्रवाढीची शक्ती**


- एक व्यक्ती 8% व्याज दराने दरमहा रू.1000 ची बचत करते असे गृहीत धरून ''चक्रवाढीची शक्ती'' ही संकल्पना स्पष्ट करण्यासाठी हे नमुन्यादाखल दिलेलं उदाहरण आहे.
- गतकालीन कामगिरी भावी काळात जतन केली जाईल/जाणारही नाही.

कृपया अन्य कोणत्याही तपशीलांसाठी तुमच्या नजीकचे म्युच्युअल फंड ऑफिस/फायनान्शियल डिस्ट्रिब्यूटर (बँका/वैयक्तिक फायनान्शियल ॲडवायजर, वगैरे) बरोबर संपर्क साधा.

# लवकर सुरूवात करणं ठरतं फायदेशीर

आपली रक्कम दीर्घ–मुदतीसाठी गुंतवणं तर महत्वाचं असतंच परंतु कमाल उत्पन्न मिळण्यासाठी, तुम्ही वेळेवर सुरूवात करणं हे निर्णायक ठरतं. पुढे दिलेल्या उदाहरणा–तून गुंतवणुकीला लवकर सुरूवात करण्याचे फायदे सहजपणे स्पष्ट होतील. रवि आणि शशी ह्यांनी मासिक चक्रवाढीच्या धर्तीवर द.सा. 8% व्याज दराने रू.2000 गुंतवायला सुरूवात केली. दोघांच्यात फरक एवढाच होता की रवीने गुंतवणुकीची सुरूवात 25व्या वर्षी केली तर शशीने गुंतवणुकीची सुरूवात 35व्या वर्षी केली. 5 वर्षांच्या कालावधीमध्ये दोघेही रू.1.2 लाख गुंतवतात आणि त्यांच्या गुंतवणुकी 60व्या वर्षापर्यंत तसेच ठेवतात. रवीची रक्कम वाढून रू.14,08,551 एवढी होते. तर शशीची फक्त रू.5,68,999 एवढीच वाढते. तर अशा प्रकारे ही गोष्ट सिद्ध होते की–कालावधी जेवढा जास्त, तेवढे उत्पन्नही मिळतं जास्त.







• एक व्यक्ती 8% व्याज दराने दरमहा रू.2000ची बचत करते असे गृहीत धरून ''चक्रवाढीची शक्ती'' ही संकल्पना स्पष्ट करण्यासाठी हे नमुन्यादाखल दिलेलं उदाहरण आहे.

कृपया अन्य कोणत्याही तपशीलांसाठी तुमच्या नजीकचे म्युच्युअल फंड ऑफिस/फायनान्शियल डिस्ट्रिब्यूटर (बँका/वैयक्तिक फायनान्शियल ॲडवायजर, वगैरे) बरोबर संपर्क साधा.

# अशी करायची गुंतवणूक

पैसे कुठे आणि कसे गुंतवायचे हे तुम्हाला माहित नसेल तर हे सर्व ज्ञान व्यर्थ आहे. त्यापूर्वी किती पैसे गुंतवावं हे कळणंही महत्वाचं आहे. ह्या प्रश्नाचं उत्तर हे तुमच्या लक्ष्यावर अवलबूंन आहे. पूर्वी सांगितल्याप्रमाणे प्रत्येकाच्या जीवनात पूर्ण करायची लक्ष्यं आणि जबाबदाऱ्या वेगळ्या असतात, त्यामुळे गुंतवणुकीची गरजही प्रत्येक व्यक्तीसाठी वेगवेगळी असू शकते. जसं की, दोन मुलं असलेल्या जोडप्याच्या जबाबदाऱ्या वेगळ्या असू शकतात. तर एका सेवानिवृत्त जोडप्याची पूर्ण करण्याची लक्ष्यं वेगळी असल्यामुळे त्यांची प्राधान्यं वेगळी असतील त्यामुळे ''खरेदी किती करावी'' हा प्रश्न गैरलागू आहे. महत्वाचा प्रश्न ''खरेदी कशी करायची?'' हा आहे.

सर्वप्रथम प्रत्येकाने आपली आर्थिक लक्ष्यं स्पष्टपणे निश्चित ठरवणं गरजेच आहे, ज्याला ''लक्ष्यांचं नियोजन'' असं म्हटलं जातं, आणि नंतर तुमची लक्ष्यं आणि तुम्ही घेऊ शकत असाल ती जोखीम ओळखून त्यानुसार म्युच्युअल फंडाचे मूल्यांकन करा. तुम्ही तो ऑनलाइन किंवा ऑफलाइन खरेदी करू शकता. ऑनलाइन खरेदी एक तर ॲसेट मॅनेजमेंट कंपनीच्या (एएमसी म्हणजेच म्युच्युअल फंड कंपनीच्या) वेबसाइटवरून किंवा म्युच्युअल फंड्स (म्हणजेच बँका, स्टॉक ब्रोकर्स) वगैरेंमध्ये गुंतवणुकीसाठी ऑनलाइन प्लॅटफॉर्मची तरतूद करणाऱ्या कोणत्याही डिस्ट्रिब्युटर पार्टनरकडून थेट खरेदी करू शकता किंवा तुम्ही तुमच्या स्थानिक फायनान्शियल डिस्ट्रिब्युटर/ॲडवायजरला कॉल करून/भेटून/पोहोचून आवश्यक असलेला फॉर्म भरावा आणि संबंधित डॉक्युमेंट्ससोबत दाखल करावा. ह्यासाठी फायनान्शियल डिस्ट्रिब्युटर तुम्हाला मदत करतील. एएमसीने (म्युच्युअल फंड कंपनीने) एकदा का तुमचा फॉर्म स्वीकारला आणि तुमची पेमेंट्स मान्य झाली की तुम्ही म्युच्युअल फंड मार्गे तुम्ही तुमच्या लक्ष्यांच्या परिपूर्तीसाठी जय्यत तयार होता.





हे एक उदहारण आहे. अशी अनेक मॉडेल्स उपलब्ध आहेत, जी तुमच्या पोर्टफोलिओतील गुंतवणुकीचा योग्य मेळ सुचवतात. वय आणि कुटुंबाचं आकारमान ह्याखेरीज अनेक वेगवेगळ्या घटकांचा संबंध असल्याने योग्य पोर्टफोलिओ बनवण्यासाठी प्रोफेशनल फायनान्शियल प्लॅनरबरोबर सल्लामसलत करा.

कृपया अन्य कोणत्याही तपशीलांसाठी तुमच्या नजीकचे म्युच्युअल फंड ऑफिस/फायनान्शियल डिस्ट्रिब्यूटर (बँका/वैयक्तिक फायनान्शियल ॲडवायजर, वगैरे) बरोबर संपर्क साधा.

# तुम्ही ह्यांच्याबरोबर सल्लामसलत करू शकता

देशभरात, म्युच्युअल फंड्सची विक्री करण्यासाठी थेट पॅनेलमध्ये नोंदणी केलेले अंदाजे सुमारे 1 लाख डिस्ट्रिब्यूटर्स आहेत. तथापि, तुम्हाला म्युच्युअल फंडासाठी सहकार्य करणारे लोक मोठ्या संख्येने आहेत कारण अनेक बँका ह्या म्युच्युअल फंडाच्या डिस्ट्रिब्युटर्स आहेत. तसेच काही मोठ्या डिस्ट्रिब्युटर्सनी अखिल भारतीय पातळीवर मोठी सेल्स टीम योजलेली आहे.



**भारतातील म्युच्युअल फंड कंपन्यांचे वेबसाइट अ‍ॅड्रेस आणि कॉंटॅक्ट नंबर**

| एएमसीचं नाव | वेबसाइट | टोल-फ्री नंबर |
|---|---|---|
| • एआयजी ग्लोबल अ‍ॅसेट मॅनेजमेंट कं. (इंडिया) प्रा. लि. | aiginvestments.co.in | 1800 200 3444 |
| • ऑक्सिस अ‍ॅसेट मॅनेजमेंट कंपनी लिमिटेड | axismf.com | 1800 3000 3300 |
| • बरोडा पायोनियर अ‍ॅसेट मॅनेजमेंट कंपनी लिमिटेड | barodapioneer.in | 1800 419 0911 |
| • बेंचमार्क अ‍ॅसेट मॅनेजमेंट कं. प्रा. लि. | benchmarkfunds.com | 1800 22 5079 |
| • भारती अक्सा इन्व्हेस्टेमेंट मॅनेजर्स प्रा. लि. | bhartiaxa-im.com | 1800 103 2263 |
| • बिर्ला सन लाइफ अ‍ॅसेट मॅनेजमेंट कं. लि. | birlasunlife.com | 1800 270 7000<br>1800 22 7000 |
| • बीएनपी परिबास म्युच्युअल फंड | bnpparibasmf.in | 022 33704000 |

| एएमसीचं नाव | वेबसाइट | टोल-फ्री नंबर |
|---|---|---|
| • कॅनरा रोबेको ॲसेट मॅनेजमेंट कं. लि. | canararobeco.com | 1800 209 2726 |
| • दायवा ॲसेट मॅनेजमेंट (इंडिया) प्रा. लि. | daiwafunds.in | 1800 419 5000 |
| • डॉइश ॲसेट मॅनेजमेंट (इंडिया) प्रा. लि. | dws-india.com | 1800 209 5005 |
| • डीएसपी ब्लॅकरॉक इन्व्हेस्टमेंट मॅनेजर्स लि. | dspblackrock.com | 1800 200 4499 |
| • एडेलवीस ॲसेट मॅनेजमेंट लि. | edelweissmf.com | 1800 425 0090 |
| • एस्कॉर्ट्स ॲसेट मॅनेजमेंट लि. | escortsmutual.com | 011 4358 7420/ 4358 7415 |
| • फिल फंड मॅनेजमेंट प्रा. लि. | fidelity.co.in | 1800 2000 400/ 1800 180 8000 |
| • फ्रँकलीन टेम्पलटन ॲसेट मॅनेजमेंट (इंडिया) प्रा. लि. | franklintempletonindia.com | 1800 425 4255/ 60004255 |
| • गोल्डमॅन सॅच्स ॲसेट मॅनेजमेंट (इंडिया) प्रा. लि. | gsam.in | 022 66279032 |
| • एचडीएफसी ॲसेट मॅनेज. कं. लि. | hdfcfund.com | 1800 233 6767 |
| • एचएसबीसी ॲसेट मॅनेजमेंट (इंडिया) प्रा. लि. | assetmanagement.hsbc.com | 66145000 |
| • आयसीआयसीआय प्रुडेन्शियल ॲसेट मॅनेजमेंट कं. लि. | icicipruamc.com | 1800 222 999/ 1800 200 6666 |
| • आयडीबीआय ॲसेट मॅनेजमेंट लि. | idbimutual.co.in | 1800 22 4324 |
| • आयडीएफसी ॲसेट मॅनेजमेंट कं. प्रा. लि. | idfcmf.com | 1800 22 6622 |
| • इंडिया इन्फोलाइन ॲसेट मॅनेजमेंट कं. लि. | iiflmf.com | 1800 200 2267 |
| • आयएनजी इन्व्हेस्टमेंट मॅनेजमेंट (इंडिया) प्रा. लि. | ingim.co.in | 1800 22 0042 |
| • जेएम फायनान्शियल ॲसेट मॅनेजमेंट प्रा. लि. | jmfinancialmf.com | 1800 1038 345 |

कृपया अन्य कोणत्याही तपशीलांसाठी तुमच्या नजीकचे म्युच्युअल फंड ऑफिस/फायनान्शियल डिस्ट्रिब्यूटर (बँका/वैयक्तिक फायनान्शियल ॲडवायजर, वगैरे) बरोबर संपर्क साधा.

| एएमसीचं नाव | वेबसाइट | टोल-फ्री नंबर |
|---|---|---|
| • जेपी मॉर्गन ॲसेट मॅनेजमेंट इंडिया प्रा. लि. | jpmorganmf.com | 1800 22 5763 |
| • कोटक महिन्द्रा ॲसेट मॅनेजमेंट कं. लि. | kotakmutual.com | 1800 22 2626 |
| • एलआयसी म्युच्युअल फंड ॲसेट मॅनेजमेंट कं. लि. | licnomuramf.com | 022 220 42450 |
| • एल अँड टी इन्व्हेस्टमेंट मॅनेजमेंट लि. | lntmf.com | 1800 209 6565 |
| • मिराए ॲसेट ग्लोबल इन्व्हेस्टमेंट मॅनेजमेंट (इंडिया) प्रा. लि. | miraeassetmf.co.in | 1800 1020 777 |
| • मॉर्गन स्टॅन्ली इन्व्हेस्टमेंट मॅनेजमेंट प्रा. लि. | morganstanley.com | 1800 425 1313 |
| • मोतिलाल ओसवाल ॲसेट मॅनेजमेंट कं. लि. | motilaloswal.com | 1800 200 6626 |
| • पीअरलेस फंड्स मॅनेजमेंट कं. लि. | peerlessmf.co.in | 1800 200 9995 |
| • प्रॅमेरिका ॲसेट मॅनेजर्स प्रा. लि. | pramericamf.com | 1800 266 2667 |
| • प्रिन्सिपल पीएनबी ॲसेट मॅनेजमेंट कं. प्रा. लि. | principalindia.com | 1800 425 5600 |
| • क्वांटम ॲसेट मॅनेजमेंट कं. प्रा. लि. | quantumamc.com | 1800 22 3863 |
| • रिलायन्स कॅपिटल ॲसेट मॅनेजमेंट लि. | reliancemutual.com | 1800 300 11111 |
| • रेलिगेअर ॲसेट मॅनेजमेंट कं. प्रा. लि. | religaremf.com | 1800 209 0007 |
| • सहारा ॲसेट मॅनेजमेंट कं. प्रा. लि. | saharamutual.com | 022 67520121/27 |
| • एसबीआय फंड्स मॅनेजमेंट प्रा. लि. | sbimf.com | 1800 425 5425 |
| • सुंदरम बीएनपी परिबास ॲसेट मॅनेजमेंट कं. लि. | sundarammutual.com | 1800 425 7237 |



| एएमसीचं नाव | वेबसाइट | टोल-फ्री नंबर |
|---|---|---|
| • टाटा ॲसेट मॅनेजमेंट लि. | tatamutualfund.com | 1800 209 0101 |
| • टॉरस ॲसेट मॅनेजमेंट कं. लि. | taurusmutualfund.com | 022 66242700 |
| • युनियन केबीसी ॲसेट मॅनेजमेंट कं. प्रा. लि. | unionkbc.com | 1800 200 2267 |
| • युटीआय ॲसेट मॅनेजमेंट कं. लि. | utimf.com | 1800 22 1230 |

कृपया अन्य कोणत्याही तपशीलांसाठी तुमच्या नजीकचे म्युच्युअल फंड ऑफिस/फायनान्शियल डिस्ट्रिब्यूटर (बँका/वैयक्तिक फायनान्शियल ॲडवायजर, वगैरे) बरोबर संपर्क साधा.

वित्तीय (आर्थिक) लक्ष्यं

▼

‘काय खरेदी करायचं’ ते ओळखा

▼

विविध म्युच्युअल फंड कंपन्यांमधील फंड्सचे मूल्यांकन करा

▼

ऑनलाइन | ऑफलाइन

▼ ▼

म्युच्युअल फंड कंपनी | फायनान्शियल डिस्ट्रिब्युटर

▼ ▼

फॉर्म भरा


▼ ▼

संबंधित डॉक्युमेंट्स जोडा

▼ ▼

दाखल करा





# समज

म्युच्युअल फंडामध्ये गुंतवणूक करण्यासाठी तुमच्याकडे डीमॅट अकाउंट असणं गरजेचं असतं.

# सत्यस्थिति

म्युच्युअल फंड्स हे थेट एएमसीकडून (म्युच्युअल फंड कंपनी) किंवा ब्रोकर द्वारा ऑनलाइन खरेदी करता येतात, तथापि प्रत्यक्ष फॉर्म भरून ऑफलाइन गुंतवणूक करणं देखील शक्य असतं. त्यासाठी नजीकच्या डिस्ट्रिब्युटिंग पार्टनरबरोबर संपर्क साधावा, जो एखादी बँक, वैयक्तिक फायनान्शियल ॲडवायजर किंवा म्युच्युअल फंड्सची विक्री करणारा एखादा स्टॉक ब्रोकर देखील असू शकेल. एखाद्याकडे डिमॅट अकाउंट असेल, तर तो/ती म्युच्युअल फंड्स डीमॅट फॉर्‌मॅटमध्ये खरेदी करू शकतात किंवा केवळ फॉर्म भरून ऑनलाइन खरेदी देखील करता येते.

कृपया अन्य कोणत्याही तपशीलांसाठी तुमच्या नजीकचे म्युच्युअल फंड ऑफिस/फायनान्शियल डिस्ट्रिब्यूटर (बँका/वैयक्तिक फायनान्शियल ॲडवायजर, वगैरे) बरोबर संपर्क साधा.

# तुम्ही गुंतवणूक केल्यानंतर

तुम्ही म्युच्युअल फंड खरेदी केल्यानंतर तुम्हाला एक स्टेटमेंट मिळेल ज्यामध्ये अनेक तपशील असतील, जसं की, तुमचे वैयक्तिक तपशील, गुंतवलेली रक्कम, सध्याची एनएव्ही वगैरे. ह्या स्टेटमेंटला 'अकाउंट स्टेटमेंट' असं म्हटलं जातं. तुमच्या गुंतवणुकीनंतर काही दिवसांनी तुम्हाला न केवळ एकदाच अकाउंट स्टेटमेंट मिळेल, तर ठराविक कालांतराने तुम्हाला अपडेटेड स्टेटमेंट्स मिळतच रहातील, अशाप्रकारे म्युच्युअल फंड हाउस तुम्हाला तुमच्या गुंतवणुकीच्या बाबतीत अपडेटेड ठेवतं.

आता आपण सर्वांनी म्युच्युअल फंड्स म्हणजे काय आणि त्यामध्ये पैसे का आणि कसे गुंतवायचे हे समजून घेतलं. त्यातील सर्वात महत्वाचा भाग ज्यासाठी आपण वेळ दिला आणि पुन्हा पुन्हा चर्चा केली; तो म्हणजे गुंतवणुकी तेव्हाच अर्थपूर्ण असतात, जेव्हा ते पैसे गरजेच्या वेळी कामाला येतात. अशाप्रकारे, गरजेच्या वेळी तुमचे पैसे परत कसे मिळवायचे ते समजून घेणं अधिकच महत्वाचं आहे.

ते तसं खूप सोपं आहे, बस्, तुम्ही एक एका फॉर्मवर सही करायची आणि तो फॉर्म एएमसीकडे (म्युच्युअल फंड कंपनी) दाखल केला गेल्याची खात्री करून घ्यायची ह्या संदर्भात खूप प्रश्न उभे रहातात, की हे सारं करायचं कसं? तर ते आपण तपशीलवार समजून घेऊ.

**पैसे काढण्यासाठी अर्ज करण्याच्या प्रक्रियेला विमोचन (Redemption) असे म्हणतात. रिडम्प्शन फॉर्म ऑनलाइन किंवा ऑफलाइन मिळवता येतात. हे विमोचन ऑनलाइन तसेच ऑफलाइन देखील करता येतं. ऑनलाइन फॉर्म फक्त 'एएमसी'च्या वेबसाइटवर उपलब्ध असतो किंवा एएमसीच्या ब्रँच ऑफिसमध्ये किंवा (आधी दिलेल्या यादीतील) एखाद्या फायनान्शियल डिस्ट्रिब्यूटरकडे प्रत्यक्ष फॉर्म मिळू शकतो. एवढंच नव्हे, तुम्हाला मिळणाऱ्या प्रत्येक अकाउंट स्टेटमेंटच्या पानाच्या तळाशी रिडम्प्शन फॉर्म असतो. तर तो फॉर्म भरावा, त्यावर सही करावी आणि तो दाखल करावा. स्कीममध्ये निर्दिष्ट केलेल्या दिवसांच्या अनुसार पैसे तुमच्या बँक अकाउंटमध्ये जमा होतील. तथापि, हा कालावधी फॉर्म दाखल केल्यानंतर कामाच्या 3 दिवसांपेक्षा अधिक असणार नाही.**

**कॉमन ट्रँजॅक्शन स्लिप**
(म्युच्युअल फंडांच्या वेबसाइटवरून डाउनलोड करा किंवा ब्रँच वा फायनान्शियल डिस्ट्रिब्युटरकडून मिळवा)

▼

**विमोचन निवडा**

▼

**संबंधित तपशील भरा**
(तुम्ही अंशत: विमोचन देखील करू शकता)

▼

**फॉर्मवर सही करा**
(युनिट्सच्या सर्व अर्जदारांनी सह्या कराव्यात)

▼

**दाखल करा**
(विशिष्ट म्युच्युअल फंड कंपनीच्या ब्रँचमध्ये दाखल करा)

▼

**तुमच्या बँक अकाउंटमध्ये पैसे जमा**
(स्कीम-निर्दिष्ट टर्नअराउंड कालावधीमध्ये तुम्हाला पैसे जमा केले जातील)

कृपया अन्य कोणत्याही तपशीलांसाठी तुमच्या नजीकचे म्युच्युअल फंड ऑफिस/फायनान्शियल डिस्ट्रिब्यूटर (बँका/वैयक्तिक फायनान्शियल ॲडवायजर, वगैरे) बरोबर संपर्क साधा.



आता, मला खात्री वाटते की तुम्ही देखील सुरेशसारखेच वागाल. ह्यातून झालेल्या जागृतीमुळे फायनान्शियल मार्केट्स आणि म्युच्युअल फंड्सबाबत तुमच्या मनात सकारात्मक प्रेरणा तयार झाली असेल. थोडक्यात सांगायचं तर, तुम्ही तुमची लक्ष्यं निश्चित करा, मग तुमचे गुंतवणुकीचे साधन ठरवा आणि तुमची लक्ष्यं व गरजा ह्यांच्या अनुसार कोणता म्युच्युअल फंड योग्य ठरेल ह्याचा विचार करा व गुंतवणूक करा. मग बाकीची काळजी म्युच्युअल फंड कंपन्या घेतील.

कृपया अन्य कोणत्याही तपशीलांसाठी तुमच्या नजीकचे म्युच्युअल फंड ऑफिस/फायनान्शियल डिस्ट्रिब्यूटर (बँका/वैयक्तिक फायनान्शियल ॲडवायजर, वगैरे) बरोबर संपर्क साधा.

**असोसिएशन ऑफ म्युच्युअल फंड्स इन इंडिया**
एसोसिएशन ऑफ म्युच्युअल फंड्स इन इंडिया
नमन कॉर्पोरेट लिंक, विंग सी, युनिट क्रमांक ७०१,
प्लॉट क्र. सी-३१/सी-३२, जी ब्लॉक,
वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स,
वांद्रे – पूर्व, मुंबई – ४०० ०५१.
विजिट करा : www.amfiindia.com